महाराष्ट्र शासन

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

## आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम ई-निविदा आर्थिक लिफाफा क्रमांक २ (BOQ)

महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास क्षमता बांधणीसाठी प्राप्त निधीतून आपत्ती व्यवस्थापनाचे काम प्रभावीपणे होणेकरिता शोध व बचाव कार्याशी संबधीत साहित्य खरेदीसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा दि.१९ जून २०१९ रोजी पासुन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

इच्छूक पुरवठादारांनी दि. 20 जून २०१९ ते दि. २६ जून २०१९ या कालावधीत ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात. सदर ई-निविदा दि. २७ जून २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे उपस्थित कंत्राटदार / अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषीत केले असेल किंवा त्या बाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्यांचेशी संलग्न असलेले कंत्राटदारांनी ई-निविदा भरु नयेत. अशा कंत्राटदारांनी ई-निविदा भरल्यास त्यांची ई-निविदा विचारात घेतली जाणार नाही.

आपत्ती व्यवस्थापनाचे काम प्रभावीपणे होणेकरिता शोध व बचाव कार्याशी संबधीत साहित्यांच्या दराबाबत

| Sr.No | Name of Equipment | QTY | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Inflatable Rescue Boat<br>(Capacity 8 Person) with Engine | 2 | |
| 2 | Life Jackets (Inflatable) | 33 | |
| 3 | Search Light<br>(1. Halogen bulb<br>2. Power Consumption-55W<br>3. Rechargeable<br>4. Range - 1 KM) | 36 | |
| 4 | Life Bouys<br>(1. Outer 76 cm diameter,<br>2. Inner 46 cm diameter,<br>3. weight 4.5 kg) | 33 | |
| | **Total=** | | |

(डॉ. राजेन्द्र भोसले भाप्रसे)

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर

महाराष्ट्र शासन
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

---

## निविदाधारकाची माहिती
( तांत्रिक लिफाफा क्रमांक-१)

| | | |
|---|---|---|
| १ | निविदाधारकांचे नाव | |
| २ | निविदाधारकाकडील एजन्सीचे/संस्था नाव | |
| ३ | निविदाधारकांचे पत्ता | |
| ४ | जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अटी व शर्ती मान्य असलेचे रु. १०० चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्रक | |
| ५ | निविदा फी रु. २,०००/- व बयाना रक्कम रु. १०,०००/- अपलोड केलेली ई-रिसीट स्लीप | |
| ६ | निविदाधारकाकडील संस्थेचे शासन मान्यता प्रमाणपत्र (उदा.संस्था नोंदणी प्रमाणपत्र प्रमाणित केलेली छायाप्रत जोडावी.) | |
| ७ | नोंदणीकृत संस्थांचे कार्यक्षेत्र (महाराष्ट्र राज्य अथवा जिल्हा) असलेबाबतचे प्रमाणपत्र | |
| ८ | Income Tax Certificate लगतच्या तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र | |
| ९ | पॅनकार्ड / टॅन झेरॉक्स प्रत | |
| १० | वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्र व वस्तु व सेवाकर भरत असलेबाबतचा पुरावा | |
| ११ | संस्थेकडे आपत्ती व्यवस्थापन या विषयाबाबत शासनाबरोबर /जिल्हाधिकारी कार्यालयाबरोबर शोध व बचाव साहित्य विक्री केलेचे पुरवठा आदेश (Work Order) | |

दिनांक :-
ठिकाण :-

निविदाधारकांची स्वाक्षरी
(दिनांकासह)

महाराष्ट्र शासन
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास क्षमता बांधणीसाठी प्राप्त निधीतून आपत्ती व्यवस्थापनाचे काम प्रभावीपणे होणेकरिता शोध व बचाव कार्याशी संबधीत साहित्य खरेदीसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा दि. जून २०१९ रोजी पासुन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. सदर साहित्य खरेदीकरिता **ई-निविदा रक्कम रु. ७.५० लाख** इतकी असून इच्छूक निविदाधारकांसाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती आहे.

१) ई-निविदा चे फॉर्म दि. **२०** जून २०१९ ते दि. **२६** जून २०१९ या कालावधीत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. निविदाधारकाने निविदा दाखल करतेवेळी निविदा फी नापरतावा रक्कम रु. २,०००/-(रुपये दोन हजार फक्त) व बयाना रक्कम रु. १०,०००/-(रु दहा हजार पाचशे फक्त) नेट बँकिंग द्वारे जमा करावी. निविदा फी व बयाना रक्कम यांची ई-रिसीट स्लीप स्कॅन प्रत निविदासोबत अपलोड करावी. ई-रिसीट स्लीप व निविदा संबधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती बंद लिफाप्यामध्ये **जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे देणे बंधनकारक** राहील.

२) यशस्वी निविदाधारकाने अनामत रक्कम रु. २२,५००/- जमा करणे आवश्यक आहे.

३) निविदाधारकाकडे महाराष्ट्र शासनाकडील आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (उदा. सुशिक्षीत बेरोजगार संस्था, धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत संस्था इ.) नोंदणीकृत संस्थांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र अथवा जिल्ह्यामध्ये असणे आवश्यक आहे.

४) निविदाधारकाकडे प्रशिक्षणाच्या बाबतीत राष्ट्रीय / आंतर राष्ट्रीय संस्था, शासनाबरोबर विविध ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनबाबतचे शोध व साहित्याचे विक्री केलेबाबतचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अनुभव असलेल्या संस्थाना प्राधान्य देणेत येईल.

५) निविदाधारकांनी स्वत:च्या संस्थेचे पॅनकार्ड, टॅनकार्ड, व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपपत्र, वस्तू व सेवाकर नोंदणी पत्र आणि वस्तु व सेवाकर भरत असलेबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

६) तसेच खरेदी प्राधिकाऱ्यांबरोबर हितसंबधांचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देणेबाबत "निविदाकारांची हमीपत्र" सोबत सादर करणेत यावे.

७) निविदामध्ये दर सर्व करांसहित प्रति नग सादर करणेत यावेत. नमूद दराव्यतिरिक्त इतर कोणतेही वाढीव दर अदा करणेत येणार नाहीत.

८) यशस्वी निविदाधारकांस खरेदी केलेल्या साहित्याची देखभाल व दुरुस्ती करणेची जबाबदारी किमान १ वर्ष राहिल.

९) L-१ निविदाधारकांनी बॅक गॅरटी देणे आवश्यक आहे.

१०) यशस्वी निविदाधारकांकडून साहित्य पुरवठा केल्यानंतर खरेदी विभागाच्या सांगण्यानुसार अधिकारी/ कर्मचारी सदर साहित्य वापराबाबत प्रत्येक उपविभागीय अधिकारी / तहसिल कार्यालयामध्ये प्रशिक्षण आयोजित करणे बंधनकारक आहे. सदर प्रशिक्षण दिलेनंतर प्रशिक्षण दिलेबाबतचा संबधीत अधिकाऱ्यांचा दाखला इकडील कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय देयक अदा केले जाणार आहे.

११) सदर कामकाजाचे ज्ञान व आवश्यक अनुभव असलेल्या सक्षम उत्पादक संस्था/ फर्म / एजन्सीज / डिलर / पुरवठादार यांस प्राधान्य देणेत येईल.

१२) निविदाधारकाने निविदामध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व साहित्याचे दर नमुद करावेत. सर्व साहित्यामध्ये नमूद केलेल्या दरांचे एकत्रित एकूण कमी दर असलेले निविदाधारकास L-१ निवड करणेत येईल.

१३) ख़रेदी करणेत येणाऱ्या साहित्याच्या मुळ उत्पादकाचे नाव, बनविण्याचे ठिकाण व त्या वस्तुंचे संपूर्ण माहितीपत्रक तसेच दुरुस्तीसाठी उपलब्ध सर्व्हिस सेंटरच माहिती ई- निविदेमध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

१४) यशस्वी निविदाधारकाने ७ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांना शोध व बचाव साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. साहित्य पुरविण्यासाठी इतर कोणतेही शुल्क, नुकसान भरपाईची रक्कम, वाहतूकीचा खर्च जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अदा केला जाणार नाही.

१५) साहित्य पुरवठा केल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ शासकीय तांत्रिक विभागाकडूनच साहित्य तपासणी करणेत येईल. सदर निरीक्षणामध्ये वस्तू नादुरुस्त अथवा निविदेमधील वैशिष्ठे नसलेली आढळल्यास सदर साहित्य बदलून देणे बंधनकारक राहील. तद्नंतर निविदाधारकांस त्यांचे नियमानुसार देयक अदा करणेत येईल. सदर साहित्यांचा वाहतूक व इतर अनुषंगिक खर्च जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अदा केला जाणार नाही.

१६) विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या निविदा जिल्हाधिकारी अथवा नेमून दिलेल्या सक्षम प्राधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत दि.      जून २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा मा. जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार निश्चित केलेल्या दिनांकास व वेळी जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे उघडणेत येतील.

१७) यशस्वी निविदाधारकांस शासन निर्णय दि. ०१.१२.२०१६ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१८) यशस्वी निविदाधारकास कोणतेही अग्रीम रक्कम देणेत येणार नाही. पुरवठा आदेशानुसार पुरवठा केलेल्या साहित्यांचे नियमाप्रमाणे तांत्रिक विभागाकडून निरीक्षण पुर्ण झालेनंतर एकूण देय होणारी रक्कम अदा करणेत येईल.

१९) कोणतीही पुर्व सुचना न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे, तसेच वेळोवेळी करारनामा, आदेश, अटी व शर्ती यांच्यात फेरबदल करणे, चालू ठेवणे अथवा संपुष्टात आणणे हे सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,सोलापूर यांचेकडे राखून ठेवणेत येत आहेत.

२०) प्रथम तांत्रिक लिफाफा क्रमांक १ उघडण्यात येईल. त्यामध्ये असलेल्या अटी व शर्तींची पुर्तता केल्यासच आर्थिक लिफाफा क्रमांक २ उघडयात येईल याची नोंद घ्यावी.

२१) निविदाधारकाने सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

२२) पुरवठा केलेल्या वस्तू नादुरुस्त अथवा निविदेमधील वैशिष्ठे नसलेली आढळल्यास अनामत रक्कम रु. २२,५००/- शासन जमा करुन केलेल्या कामाचे कोणतेही देयक अदा केले जाणार नाही. तसेच सदर संस्थेचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करणेत येईल.

दिनांकः- 20.०६.२०१९
ठिकाणः- सोलापूर

(डॉ. राजेन्द्र भोसले भाप्रसे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**